# म्हाडाच्या विभागीय मंडळांतर्फे काढण्यात येणा-या सदनिका सोडतीत 'पत्रकार' संवर्गातील विजेत्या अर्जदारांनी पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी करावयाची कार्यवाही

पत्रकार संवर्गातील विजेत्या अर्जदारांनी संबंधित मंडळाकडून प्रथम सूचना पत्र (First Intimation Letter) प्राप्त झाल्यानंतर पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी **मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**, कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, म्हाडा मुख्यालय, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००२२ या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत लिखित स्वरूपात अर्ज सादर करावा.

**अर्जासोबत खालील आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.**

१) पत्रकारितेत सलग किमान ५ वर्ष अनुभव असल्याचे प्रमाणपत्र किंवा पत्रकार म्हणून काम केलेल्या संस्थेतील नियुक्ती पत्राची स्वसाक्षांकित छायांकित प्रत,

२) माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील निव्वळ पत्रकारितेतून मिळणा-या उत्पन्नासंदर्भातील कागदपत्रांची स्वसाक्षांकित छायांकित प्रत (वेतन प्रमाणपत्र, वेतन पावत्या, मानधन बँक खात्यावर जमा झाल्याचे बँक स्टेटमेंट/पासबुक छायांकित प्रत, मुक्त पत्रकारितेकरिता मानधन मिळाल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र),

३) संबंधित वृत्तपत्राच्या संपादकांची शिफारस,

४) माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील वृत्तपत्रांत स्वत:च्या नावानाशी प्रसिद्ध/प्रकाशित (By line/ Credit line) बातम्या / लेख यांची किमान १० कात्रणे किंवा वृत्तवाहिनीत स्वत:च्या नावानीशी प्रसारित बातम्यांचे व्हिडीओ सीडीमध्ये सादर करावेत.

५) ओळखपत्राची छायांकित प्रत

उपरोक्त कागदपत्रे समक्ष **मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**, कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, म्हाडा मुख्यालय, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००२२ या कार्यालयात सादर केल्यानंतर सादर कागदपत्रांच्या आधारावर निर्णय घेऊन संबंधित अर्जदारांना पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र वितरीत केले जाईल.